# पूर्व आणि उत्तर-पूर्व भारतातील वन्यजीव स्थळं

**अतुल धामनकर**

**रिया पब्लिकेशन्स्**

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**पूर्व आणि उत्तर-पूर्व भारतातील वन्यजीव स्थळं**
अतुल धामनकर

© सुरक्षित

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर. ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**लेखक**
अतुल धामनकर
पटेल हायस्कूलसमोर,
शिवाजी चौक, चंद्रपूर - ४४२४०२
मो. न. : ७६२०७९२२०६, ९४२३६१९९३३
E mail : atultiger@rediffmail.com.

**अक्षरजुळणी**
अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**
ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**
ऑगस्ट २०१६

**किंमत**
₹ २००/-

# लेखकाचे मनोगत

भारत हा नैसर्गिक साधनसंपत्तीने अतिशय संपन्न असलेला देश आहे. इथे कोणत्याही भागात गेलं तरी तुम्हाला संस्कृतीच्या विविधतेसोबत जैवविविधतेचाही आनंद घेता येतो. अगदी हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत आणि गुजरातच्या पश्चिमी टोकापासून अरुणाचल प्रदेशच्या पूर्व टोकापर्यंत भारतातील वन व वन्यजीवांमध्ये कमालीचं वैविध्य आहे. या वन्य जीवनाबद्दल अभ्यासपूर्ण लेखन मागील काही वर्षांत बरंच झालंय. त्यांच्यासोबतच आज विविध दूरदर्शन वाहिन्यांवरूनदेखील वन्यजीवांच्या अंतरंगात डोकावणारे अभ्यासपूर्ण अनेक कार्यक्रम अव्याहतपणे सुरू असतात. साहजिकच आज सामान्य लोकांमध्येदेखील वन व वन्यजीवांविषयी फार उत्सुकता जागृत झाली आहे. त्याच उत्सुकतेतून ते भारतातील अनेक व्याघ्र प्रकल्प, राष्ट्रीय उद्यानं आणि वन्यजीव अभयारण्यांना भेटी देऊन तिथे नैसर्गिक अवस्थेतील वन्य जीवन न्याहाळण्याचे आणि त्याला कॅमेराबद्ध करण्याचे ठरवतात.

पण असं असलं तरी वन्यजीव निरीक्षणाला सहज कुठल्याही पर्यटनासाठी बाहेर पडावं, तसं जाऊन चालत नाही. वन्यजीव क्षेत्रे नेहमीच दूरवर वसलेली असतात. बहुधा त्यांच्या आसपास मोठी शहरं-गावंही नसतात. त्यामुळे इथे जाण्यासाठी बरीच पूर्वतयारी करणं आवश्यकच ठरतं.

अशा जंगल भेटीसाठी बाहेर पडण्यापूर्वीच त्याची नीट माहिती करून आखणी करणं अतिशय गरजेचं असतं. त्यामुळे सगळ्यात आधी त्या अरण्याची इत्थंभूत माहिती मिळवणं, कुठून कसं जायचं हे ठरवणं, विमान, रेल्वे, बस, खासगी टॅक्सीची तिकिटं किंवा अग्रीम आरक्षण करणं, प्रवेशपत्र प्राप्त करणं, हॉटेल किंवा वनविश्रामगृहाचं आरक्षण करणं, त्या जागी कोणकोणते वन्य प्राणी-पक्षी आढळतात त्याची आधीच माहिती करून त्यांच्या निरीक्षण किंवा प्रकाशचित्रणासाठी काय-काय करावं लागेल, कोणती फोटोग्राफी उपकरणं सोबत

घ्यावी लागणार याची आखणी करणं, हे मोठंच काम असतं. अशा वेळी अगदी छोट्याशा माहितीअभावी देखील तुमची भटकंती गोत्यात येऊ शकते. कित्येक वेळा एखाद्या बाबीची माहिती नसल्याने प्रत्यक्ष त्या अरण्यात गेल्यावर जंगलफेरी न मिळणे, हॉटेल न मिळणे, वाहतुकीच्या साधनांची कमतरता यासारख्या बाबी तुमचा भ्रमंतीचा आनंदच हिरावून घेऊ शकतात.

आज बऱ्याच वन्यजीव क्षेत्रांत अनेक टूर ऑपरेटर्स भ्रमंती आयोजित करून देतात; पण इथे जाताना या टूर ऑपरेटर्सना फक्त हॉटेल-टॅक्सी बुकिंगशिवाय इतर कुठल्या बाबतींची माहिती आहे की नाही, हे आपल्याला माहीत नसतं. खासकरून वन्यजीव, त्यांचा आढळ, त्यांची स्थळं, वन्यजीव निरीक्षण व फोटोग्राफीच्या संधी या बाबी अशा टूर ऑपरेटर्सना माहिती आहेत काय, हे आधीच तपासून घ्यावं. कारण एखाद्या ऐतिहासिक किंवा धार्मिक स्थळाला भेट देण्यासारखं वन्यजीव पर्यटन नक्कीच नसतं. त्यात शेवटी तुम्हाला प्रवास, राहणं-खाणं या बाबींसोबतच उत्तम वन्यजीव निरीक्षणाच्या संधी मिळणंही तेवढंच महत्त्वाचं असतं. असं न झाल्यास तुमच्या अरण्यभेटीचा आनंदच कमी होऊन हिरमोड होऊ शकतो.

निसर्गात जाताना मनात उत्साह असला तरी काही अवास्तव कल्पना घेऊन मुळीच जाऊ नये. उदा. मी ताडोबाला जातोय ते वाघच बघायला चाललोय, असे बरेच जण सांगतात; पण असं करताना त्यांना वाघ हा जंगलातील अत्यंत लपून-छपून वावरणारा, धूर्त शिकारी प्राणी आहे, या गोष्टीचं भान नसतं. निसर्गाने त्याला जंगलातील कुठल्याही अधिवासात बेमालूमपणे मिसळून जाण्याची अद्वितीय अशी देणगी दिली आहे. त्यामुळेच तो अतिशय चौकस, तीक्ष्ण नाक, कान, डोळे असणाऱ्या चितळ, सांबर, रानगवे यांची शिकार करू शकतो. साहजिकच तो या जनावरांच्या तुलनेत कितीतरी कमी इंद्रियसंवेदना असलेल्या माणसापासून सहजपणे लपू शकतो. त्यामुळे वाघ बघण्याचा प्रयत्न करणं हा वन्यजीव पर्यटनातला एक भाग झाला; पण वाघच दिसला पाहिजे हा अट्टाहास चुकीचाच ठरतो. त्याशिवायदेखील ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पात आणखी ४४ प्रजातींचे सस्तन प्राणी आणि २८० पेक्षा जास्त प्रकारचे रंगीबेरंगी पक्षीपण आहेत, हे लक्षात ठेवावं. म्हणजे तुम्ही जंगलात फिरताना तुम्हाला लगेचच वाघ दिसेल असं होणार नाही; पण बरेच पक्षी, प्राणी हे नक्कीच दिसतील. त्यामुळे

त्यांच्याकडे डोळसपणे बघणं, त्यांचं निरीक्षण करणं हा आनंद तुम्ही भरपूर प्रमाणात घेऊ शकता. पुढे जेव्हा तुम्हाला कधीही वाघ दिसेल तेव्हा तो आनंद द्विगुणित होईल, याची खात्री बाळगा.

आजकाल निसर्ग पर्यटनाला निघताना अनेकजण कुटुंबासह मित्रफोटोग्राफर्सचा ग्रुप किंवा लहान-मोठ्या गटाने जातात. त्यावेळी प्रत्येकाचा निसर्गाकडे बघण्याचा दृष्टिकोन वेगवेगळा असतो; पण निसर्ग, वन्य जीवन हे आपल्या ताब्यात नाही, तसेच त्यांना कुठल्याही वेळेचे बंधनसुद्धा नसते, हे नीट ध्यानात ठेवावं. त्यामुळे एखाद्या स्थळाला भेट देण्यासारखं न जाता या पर्यटनासाठी जास्तीचा वेळ ठेवावा. बरेचजण अशा जागी जातानादेखील धावती भेट देतात. जेव्हा कुणी मला गर्वाने सांगतात, की हो आम्हीसुद्धा भरतपूरला जाऊन आलोय आणि तिथे चांगलं दीड तास होतो, तेव्हा या वाक्यावर हसावं की रडावं, हेच कळत नाही. जयपूरहून आग्र्याला जाताना हे भोज्याला शिवल्यासारखं वाटेतल्या भरतपूरला फक्त हात लावून येतात. खरं तर युनेस्कोची 'वर्ल्ड हॅरिटेज साईट' असलेलं भरतपूर जगातलं एक उत्कृष्ट पक्षी अभयारण्य आहे. इथे कमीत कमी ३-४ दिवस घालवले नाही, तर तुम्ही त्याचं नीट निरीक्षणसुद्धा करू शकणार नाही. त्यामुळेच कुठेही निसर्ग पर्यटनाला जाताना चार दिवसांत तीन अभयारण्ये किंवा सहा दिवसांत चार-पाच जंगलांना भेटी देण्याचे प्रोग्राम मुळीच आखू नयेत. त्यामुळे तुम्हाला कोणत्याही जंगल व त्यातील वन्यजीवांचे नीट अवलोकन करायची संधी मिळणार नाही. साहजिकच तुमचे वन्यजीव निरीक्षणाबद्दलचे मत कलुषित होण्याची शक्यता असते. आम्ही चांगले एक दिवस ताडोबात होतो आणि तरीही आम्हाला वाघ दिसला नाही, असे म्हणणाऱ्यांना मी नेहमी सांगतो की, इथे तुम्ही तीन-चार दिवस राहून कमीत कमी चार ते सहा जंगल सफारी केल्या तरच तुम्हाला नीट वन्यजीव निरीक्षण करायची संधी मिळू शकेल.

कुठलाही वन्य प्राणी खात्रीशीर दिसणं ही बाब गृहीत धरणं हेच चुकीचं आहे. 'वन्य' या शब्दातच ते ध्वनित होतं. वन्य जीवन हे ठरवून बघता येत नाही, यातच त्याची गोडी आणि आनंद टिकून असतो. त्यामुळे पुढे काय घडणार, काय दिसणार, ही हुरहूर तुम्हाला परत-परत त्याच जंगलाकडे आकृष्ट करते. त्यामुळे बरेच निसर्गप्रेमी सतत, एकाच जंगलाच्या वर्षानुवर्षे वाऱ्या करूनदेखील कंटाळत नाहीत.

मी या पुस्तकात जंगल व वन्यजीव पर्यटनासाठी आवश्यक असलेल्या प्रत्येक गोष्टींचा अंतर्भाव करायचा प्रयत्न केला आहे. मी मागील २३ वर्षे भारतातील विविध अरण्यांतून वन्यजीवांचं निरीक्षण, अभ्यास आणि प्रकाशचित्रणासाठी भटकंती करतोय. त्यातूनच आलेल्या अनुभवांवर हे पुस्तक आधारित आहे. त्यामुळे याचा निसर्गप्रेमी भटक्यांना भरपूर उपयोग होईल, अशी अपेक्षा आहे. त्याशिवाय कुणाला आणखी काही माहिती हवी असल्यास त्यांनी खालील मोबाईल नंबर किंवा ई मेलवर माझ्याशी संपर्क साधावा.

भारतातील पश्चिम, पूर्व, दक्षिण, उत्तर आणि मध्य या पाच भागांवरील मालिकेतील 'पूर्व व उत्तर पूर्व' भारतातील वन्यजीव स्थळं', हे पुस्तक तुमच्या हातात देताना खूप आनंद होतोय. यासाठी मी माझे प्रकाशक व इतर प्रत्येकाचा ज्यांचा हातभार या पुस्तकाच्या निर्मितीसाठी लागला आहे त्यांचा मन:पूर्वक आभारी आहे.

धन्यवाद!

आपला,<br>
अतुल धामनकर,

✦✦✦

# अनुक्रमणिका



१) डिब्रु सौखोवा व्याघ्र प्रकल्प ...................................... ११
२) काझीरंगा व्याघ्र प्रकल्प ......................................... १३
३) मानस व्याघ्र प्रकल्प ............................................ १५
४) नामेरी व्याघ्र प्रकल्प ............................................ १७
५) नामदाफा व्याघ्र प्रकल्प ......................................... १९
६) पाकूई व्याघ्र प्रकल्प ............................................ २१
७) दाम्पा व्याघ्र प्रकल्प ............................................ २३
८) सिमलीपाल व्याघ्र प्रकल्प ....................................... २५
९) बक्सा व्याघ्र प्रकल्प ............................................ २७
१०) सुंदरबन व्याघ्र प्रकल्प ......................................... २९
११) सतकोसिया व्याघ्र प्रकल्प ...................................... ३१
१२) सुनाबेदा व्याघ्र प्रकल्प ......................................... ३३
१३) भितरकनिका राष्ट्रीय उद्यान ..................................... ३५
१४) गोरूमारा राष्ट्रीय उद्यान ........................................ ३७
१५) जलदापारा राष्ट्रीय उद्यान ....................................... ३९
१६) कैबुल लामजाओ राष्ट्रीय उद्यान ................................ ४१
१७) खांग्चेनझोंगा राष्ट्रीय उद्यान .................................... ४३
१८) मौलिंग राष्ट्रीय उद्यान ........................................... ४५
१९) नेओरा व्हॅली राष्ट्रीय उद्यान ..................................... ४७
२०) नोक्रेक राष्ट्रीय उद्यान ........................................... ४९
२१) ओरांग राष्ट्रीय उद्यान............................................ ५१
२२) फावंगपुई ब्ल्यू माऊंटन राष्ट्रीय उद्यान ............................ ५३
२३) सिरोही राष्ट्रीय उद्यान ........................................... ५५
२४) सिंगालीला राष्ट्रीय उद्यान ....................................... ५७
२५) दिबांग वन्यजीव अभयारण्य ..................................... ५९

२६) कमलांग वन्यजीव अभयारण्य .................................. ६१
२७) मेहाओ वन्यजीव अभयारण्य .................................... ६३
२८) ईगलनेस्ट वन्यजीव अभयारण्य ................................. ६५
२९) इटानगर वन्यजीव अभयारण्य.................................... ६७
३०) सेस्सा ऑर्किड अभयारण्य...................................... ६९
३१) काने वन्यजीव अभयारण्य....................................... ७१
३२) बोरनदी वन्यजीव अभयारण्य .................................... ७३
३३) चक्रसिला वन्यजीव अभयारण्य.................................. ७५
३४) पानी-दिहिंग वन्यजीव अभयारण्य............................... ७७
३५) होलांगापार गिबन वन्यजीव अभयारण्य .......................... ७९
३६) प्रोबीतोरा वन्यजीव अभयारण्य .................................. ८१
३७) सोनाई-रूपाई वन्यजीव अभयारण्य.............................. ८३
३८) बोराजन वन्यजीव अभयारण्य.................................... ८७
३९) ईस्ट कारबी अंगलोंग वन्यजीव अभयारण्य ....................... ८९
४०) नंबोर वन्यजीव अभयारण्य ...................................... ९१
४१) मरात लोंगरी वन्यजीव अभयारण्य ............................... ९३
४२) नंबोर डोईगुरूंग वन्यजीव अभयारण्य............................ ९५
४३) अमचांग वन्यजीव अभयारण्य .................................... ९७
४४) देहींग पटकाई वन्यजीव अभयारण्य .............................. ९९
४५) बोराली वन्यजीव अभयारण्य .................................... १०१
४६) गरमपानी वन्यजीव अभयारण्य.................................. १०३
४७) लौखवा वन्यजीव अभयारण्य.................................... १०५
४८) पभा वन्यजीव अभयारण्य ....................................... १०७
४९) यागोऊपोक्पी लोकचाओ वन्यजीव अभयारण्य ................... १०९
५०) नोंगखायलेम वन्यजीव अभयारण्य ............................... १११
५१) सिजू पक्षी अभयारण्य.......................................... ११३
५२) नगेंगपूई वन्यजीव अभयारण्य.................................... ११५
५३) फकीम वन्यजीव अभयारण्य..................................... ११७
५४) इंटांकी वन्यजीव अभयारण्य..................................... ११९
५५) बादरामा वन्यजीव अभयारण्य .................................... १२१

५६) बालुखंड कोणार्क वन्यजीव अभयारण्य........................... १२३
५७) चंदाका दामपारा वन्यजीव अभयारण्य............................ १२५
५८) डेबरीगड वन्यजीव अभयारण्य.................................. १२७
५९) चिलीका पक्षी अभयारण्य....................................... १२९
६०) लखारी वन्यजीव अभयारण्य ................................... १३१
६१) बारसे रोडेडेंड्रान अभयारण्य .................................... १३३
६२) फामबोंग ल्हो वन्यजीव अभयारण्य ............................. १३५
६३) क्योंगनोस्ला अल्पाईन अभयारण्य .............................. १३७
६४) मिनम वन्यजीव अभयारण्य ..................................... १३९
६५) शिंग्बा रोडेडेंड्रान अभयारण्य.................................... १४१
६६) गुमटी वन्यजीव अभयारण्य ..................................... १४३
६७) तृष्णा वन्यजीव अभयारण्य...................................... १४५
६८) सेंछाल वन्यजीव अभयारण्य ................................... १४७
६९) बिभूतीभूषण वन्यजीव अभयारण्य .............................. १४९
७०) बेथूदाहारी वन्यजीव अभयारण्य ................................ १५१
७१) चापरामारी वन्यजीव अभयारण्य................................ १५३
७२) महानंदा वन्यजीव अभयारण्य ................................... १५५
७३) रायगंज पक्षी अभयारण्य ........................................ १५७
७४) जंगलात जाताना... ............................................ १५९

✦✦✦





# डिब्रु सौखोवा व्याघ्र प्रकल्प

## रानम्हशींचा प्रदेश...

**राज्य :** आसाम
**जिल्हा :** तिनसुकीया
**कुठे आहे :** डिब्रु नदीच्या काठावर वसलं आहे.
**अंतर :** तिनसुकीयापासून १८ कि.मी. वर आहे.

**अरण्याबद्दल थोडंसं :** डिब्रु सैखोवा व्याघ्र प्रकल्प हा आसामच्या कोंदणातील एखादा हिरा शोभावा असाच सुरेख आहे. या जंगलाला आधी राष्ट्रीय उद्यान व नंतर बायोस्फियर रिझर्व्ह घोषित करण्यात आलं होतं. आता मात्र त्याला व्याघ्र प्रकल्पाचा योग्य दर्जा बहाल करण्यात आला आहे. एकूण ३४० चौ. कि. मी. क्षेत्रफळाचं हे जंगल अनेक प्रकारच्या दुर्मीळ आणि धोक्यात असलेल्या प्राण्या-पक्ष्यांचं आश्रयस्थळ आहे. त्याशिवाय इथल्या जबरदस्त पक्षीवैविध्यामुळे याला 'इंपॉर्टंट बर्ड एरिया' (IBA) चा दर्जाही देण्यात आला आहे.

**कशी कराल भ्रमंती :** इथे आत फिरण्यासाठी फारसे रस्ते नसल्यामुळे सोबत वनखात्याचा सशस्त्र गार्ड व मार्गदर्शक घेऊन पायीच चालावं लागतं. बोटीने देखील फिरण्याची सोय इथे आहे.

**कशासाठी जाल :** रानम्हैस, हत्ती, लाजवंती वानर, हुलुक गिबन आणि जेरडॉनच बुशचॅट, मार्श बॅबलर, बेयरचा पोचार्ड असे सुमारे ३९० पेक्षा जास्त प्रकारचे दुर्मीळ पक्षी.

**जाण्याचा उत्तम काळ :** इथे पाऊसकाळात भरपूर पाऊस पडून नद्यांना पूर येतो. त्यामुळे डिसेंबर ते मार्च हा इथे जाण्याचा उत्तम काळ आहे.

**वनस्पती :** इथले जंगल अतिशय घनदाट असून त्यात प्रामुख्याने नदीकाठी बेताची (Cane grass) दाटी दिसून येते. अनेक पाणवनस्पतीही या ठिकाणी आहेत.

**वन्य प्राणी** : रानटी हत्ती, वाघ, बिबळा, रानम्हैस, गंगेची डॉल्फिन, लाजवंती वानर (slow loris), आसामी माकड, लाल तोंडाचे उत्तरी माकड, कॅप वानर, हुलुक

गिबन, रानडुक्कर, रानमांजर, वाघाटी, झिपरे अस्वल, उदमांजर, काकर, सांबर, फेरल घोडे, मुंगूस.

**पक्षीजीवन :** मोठा चंदनेश्वर, पट्टकादंब, कलहंस, लहान कलहंस, बेयरचा पोचार्ड, मत्स्यगरुड, काळ्या मानेचा करकोचा, मोठी मराल, ठिपकेदार गरुड, मार्श बॅबलर, जेरडॉनचा बुशचॅट, ब्लॅक ब्रेस्टेड पॅरोटबील, पेलकॅप पीजन, मोठा धनेश, पेलिकन, अडई, पाणकावळा.

**सरपटणारे जीव :** अजगर, नाग, मण्यार, घोरपड, धामण, विरोळा, आसाम रूफ टर्टल, राजनाग, मगर, सापसुरळी, बँडेड क्रेट, सॉफ्ट शेल टर्टल, किल बॉक्स टर्टल.

**कुठे–काय बघाल :** केन ग्रासच्या जंगलातून पायी चालताना रानम्हशींसाठी चौफेर लक्ष ठेवा. नावेने डिब्रु नदीत गेल्यास सहजपणे गंगेटीक डॉल्फिन दिसतात.

**आसपासची बघण्यायोग्य स्थळं :**

१) बोराजान वन्यजीव अभयारण्य

२) तिनसुकिया

**कसे जाल :**

**जवळचे विमानतळ :** मोहनबारी, डिब्रुगड (४० कि.मी. तिनसुकियापासून)

**जवळचे रेल्वे स्टेशन :** तिनसुकिया (१८ कि.मी.)

**जवळचे बस स्थानक :** ढोल्ला हे सैकोवाघाट या प्रवेश पॉईंटजवळचे बस स्थानक आहे. न्यू तिनसुकिया इथून टॅक्सी किंवा ऑटोरिक्षानेही प्रवेशद्वारापर्यंत पोहोचता येते.

**कुठे राहाल :** डिब्रु नदीकाठी अगदी साधेसे हट्स आहेत.

वनश्री इको कँप,
गुईजन, तिनसुकिया, आसाम.
फोन नं. :– ०३७४–२२३७७६६

प्रवेशपत्र, परवानगी व सशस्त्र गार्डसाठी संपर्क :– उपविभागीय वनाधिकारी
तिनसुकिया वन्यजीव विभाग,
तिनसुकिया, आसाम–७८६१२६
फोन नं. : ०३७४–२३३१४७२

✦



# काझीरंगा व्याघ्र प्रकल्प

## दुर्मीळ एकशिंगी गेंड्यासाठी...

**राज्य :** आसाम
**जिल्हा :** गोलाघाट व नागांव
**कुठे आहे :** ब्रह्मपुत्रा नदीच्या दक्षिण तीरावर
**अंतर :** जोरहाटपासून ९७ कि.मी. वर.

**अरण्याबद्दल थोडंसं :** जगभरात दुर्मीळ असलेल्या एकशिंगी गेंड्याच्या उत्तम जतन व संरक्षणासाठी 'काझीरंगा व्याघ्र प्रकल्प' अत्यंत प्रसिद्ध आहे. मध्य आसामच्या नागांव आणि गोलाघाट जिल्ह्यातील ब्रह्मपुत्रेच्या तीरावर असलेलं हे जंगल आणखीही अनेक प्रकारच्या प्राण्या-पक्ष्यांचं घर आहे. या अभयारण्याला १९५० साली अभयारण्याचा, तर १९७४ साली राष्ट्रीय उद्यानाचा दर्जा देण्यात आला होता. १९८५ साली युनेस्कोने या अप्रतिम जंगलाला 'जागतिक वारसा स्थळा'चा दर्जा प्रदान केला. एकूण ४८० चौ. कि. मी. क्षेत्रात पसरलेलं हे जादूई जंगल कोणत्याही निसर्गप्रेमीचं स्वप्न ठरावं असंच आहे.

**कशी कराल भ्रमंती :** इथे उघड्या जिप्सीतून किंवा हत्तीच्या पाठीवरून भ्रमंती करून वन्यजीव निरीक्षण करता येते.

**कशासाठी जाल :** वाघ, रानम्हशी, एकशिंगी गेंडा, रानटी हत्ती, दलदलीतला बाराशिंगा आणि ४५० प्रकारचे पक्षी.

**जाण्याचा उत्तम काळ :** वन्यजीव आणि पक्षीनिरीक्षणासाठी इथे जाण्याचा उत्तम काळ नोव्हेंबर ते एप्रिलच्या सुरुवातीपर्यंत आहे.

**वनस्पती :** इथे जागोजागी घनदाट जंगलासोबतच हत्ती गवताचे मैदान तसेच पाण्यात वॉटर हायसिंथ वनस्पती पसरलेली दिसते. सावरी, पांगारा, बांबू हे वृक्ष इथे आहेत.

**वन्य प्राणी** : भारतीय एकशिंगी गेंडा, हॉग बॅजर, हुलुक गिबन, आसामी माकड, दलदलीतला बाराशिंगा, वाघ, रानटी हत्ती, रानम्हैस, पाडा, काकर, सांबर, बिबळा, झिपरे अस्वल, हुदाळे.

**पक्षीजीवन :** करड्या डोक्याचा मत्स्यगरुड, पलासचा गरुड, ठिपकेवाला गरुड, कैकर, शिक्रा, सर्पगरुड, ठिपकेदार पेलिकन, पट्टकादंब, कलहंस, मोठा धनेश, शबल धनेश, काळ्या मानेचा करकोचा, मोठा चंदनेश्वर, एमरल्ड डव्ह, लाल छातीचा पोपट, कलीज फेजंट, नीलपंख, वेडा राघू, टकाचोर, कोकीळ, ससाणा, चंडोल, भारद्वाज, हरेल, शिंजीर, फुलचोखे.

**सरपटणारे जीव :** राजनाग, मण्यार, बँडो क्रेट, धामण, मगर, असम रूफ टर्टल, पाणकासव, घोरपड, विरोळा, पिट व्हायपर.

**कुठे–काय बघाल :** हत्तीवरून सफारी कोहरा गेटजवळून सुरू होते. तो गेंडा बघण्याचा सोपा आणि खात्रीशीर मार्ग आहे.

**आसपासची बघण्यायोग्य स्थळं :**

१) जोरहाट शहर (९७ कि.मी.)

२) गोहाटी शहर (२५० कि.मी)

**कसे जाल :**

**जवळचे विमानतळ :** जोरहाट (९७ कि.मी.), गोहाटी (२५० कि.मी.)

**जवळचे रेल्वे स्टेशन :** जोरहाट (९७ कि.मी.)

**जवळचे बस स्थानक :** कोहरा गेट हे राष्ट्रीय महामार्ग क्र. ३७ वरच असल्याने इथे येण्यासाठी गोहाटी आणि जोरहाटवरून बऱ्याच बसेस आहेत. या दोन्ही जागी टॅक्सीही मिळू शकते.

**कुठे राहाल :**

१) 'अरण्य टूरिस्ट लॉज' हे वनखात्याचे विश्रामगृह आहे.


फोन नं. : ०३७७६–२६२४२९

२) याशिवाय इथे अनेक खासगी, उत्तम रिसॉर्टसुद्धा आहेत.

वाईल्ड ग्रास रिसॉर्ट

फोन नं.: ०३७७६–२६२०८५,२६२०११

✦



# मानस व्याघ्र प्रकल्प

## सोनेरी वानर, पिग्मी हॉग अन् हिस्पीड हेर...

**राज्य :** आसाम
**जिल्हा :** बारपेटा रोड
**कुठे आहे :** भारत-भूतान सीमेवर मानस नदीलगत स्थित.
**अंतर :** बारपेटा रोडपासून ३२ कि.मी. वर.

**अरण्याबद्दल थोडंसं :** आसामच्या अगदी उत्तर टोकाजवळ असलेला 'मानस व्याघ्र प्रकल्प' हा भारत आणि भूतानच्या सीमारेषेवर आहे. हे नाव याला या दोन्ही देशांची सीमा असलेल्या मानस या नदीमुळे मिळालेलं आहे. या अरण्याला १९७३ साली व्याघ्र प्रकल्पात समाविष्ट करण्यात आलं. त्यानंतर १९९० साली या जंगलाला राष्ट्रीय उद्यानाचा दर्जा बहाल झाला. या अरण्याच्या सौंदर्य आणि जैवविविधतेच्या संपन्नतेमुळे युनेस्कोने याला 'वर्ल्ड हेरिटेज साईट'चा दर्जा दिला आहे. या व्याघ्र प्रकल्पाचं एकूण क्षेत्रफळ ३२१ चौ. कि. मी. असून हे सगळे जंगल जवळपास २८३७ चौ. कि. मी. मध्ये पसरलेलं आहे. सोनेरी वानरांच्या वास्तव्यामुळे या अरण्याला एक वेगळीच झळाळी प्राप्त झाली आहे.

**कशी कराल भ्रमंती :** मानस इथे उघड्या जिप्सीतून आणि हत्तीवरून सफारी करून वन्यजीव निरीक्षण करता येते.

**कशासाठी जाल :** सोनेरी वानर (गोल्डन लंगूर), हिस्पीड हेर, पिग्मी हॉग आणि ३५० पेक्षा जास्त प्रकारचे पक्षी.

**जाण्याचा उत्तम काळ :** इथे जाण्याचा सर्वोत्तम काळ हा डिसेंबर ते एप्रिल असा आहे.

**वनस्पती :** सावरी, नाहर, परोली, पांगारा, हाती पेहला, हत्ती गवत, बांबू, केन, अमरी आणि औषधी वनस्पती.

**वन्य प्राणी** : हिस्पीड हेर, पिग्मी हॉग, एकशिंगी गेंडा, सोनेरी वानर, वाघ, हत्ती, हिमालयीन काळे अस्वल, पाडा, सांबर, काकर, रानडुक्कर, कॅप लंगूर, आसामी माकड, मलायन जायंट स्क्विरल, हुदाळे, रानम्हैस.